दैनिक
# रायगड नगरी
अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २९८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२२ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात ४८ हजार २७० नव्या रुग्णांची भर तर ५२ रुग्णांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील कोरोनाची रुग्णसंख्येत चढ–उतार दिसून येत आहे. गेल्या २४ तासात राज्यात कोरोनाच्या ४८ हजार २७० नव्या रुग्णांची भर पडली असून ५२ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात गेल्या २४ तासात ४२, ३९१ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. काल राज्यात कोरोनाच्या ४६ हजार १९७ रुग्णांची नोंद झाली होती म्हणजे आज दोन हजार रुग्णांची वाढ झाली आहे.

राज्यात आज १४४ ओमायक्रॉनबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. आतापर्यंत २३४३ ओमायक्रॉनबाधितांची नोंद राज्यात झाली आहे. त्यापैकी ११७१ रुग्ण ओमायक्रॉनमुक्त झाले आहे. राज्यात आज ५२ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर १.९१ टक्के झाला आहे. राज्यात आतापर्यंत ७० लाख ०९ हजार ८२३ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९४.४७ टक्के आहे. सध्या राज्यात २३ लाख ८७ हजार ५९३ व्यक्ती होम क्वॉरंटाईनमध्ये आहेत तर ३३५७ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

# दि.बा.च्या नावासाठी २४ जानेवारीला विमानतळ काम बंद लाक्षणिक आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**आता बस पुरे झाले; दिबांच्या नावासाठी काहीही झाले तरी चालेल, अशी रोखठोक भूमिका कायम ठेवत 'जय दिबा' असा जयघोष करत २४ जानेवारीला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम बंद पाडण्यात येणार आहे. लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, २७ गाव प्रकल्पबाधित कृती समिती व इतर संघटनांची महत्वपूर्ण बैठक आज (शुक्रवार दि. २१) पनवेल शहरातील महात्मा फुले सभागृह (आगरी समाज हॉल) येथे कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थित बैठक पार पडली. त्यावेळी हा निर्णय जाहीर करत यशस्वी होईपर्यंत आंदोलने करीत राहणार असल्याची गर्जना करण्यात आली.**



प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत कायम उदासीन राहिलेल्या सिडकोच्या विरोधात २४ जानेवारीला विमानतळाचे काम बंद आंदोलन करून सिडकोला जोरदार दणका देण्यात येणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र एकवटला आहे. यापूर्वी आंदोलने करत भूमिपुत्रांची ताकद सिडको आणि शासनाला दाखविण्यात आली आहे. नुकताच झालेल्या भूमिपुत्र निर्धार परिषदेत दिबांचे नाव लागल्याशिवाय विमान उडणार नाही, आणि त्यासाठी काहीही करावे लागले तरी चालेल असा एल्गार पुकारण्यात आला. दरम्यान सिडको व शासनाने अद्यापही त्यांची मुजोरी कायम ठेवली आहे, त्यामुळे २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन जोरदारपणे करण्यात येणार आहे, आणि या आंदोलनाची तयारी पूर्ण झाली असल्याचे या बैठकीत स्पष्ट दिसून आले.

या बैठकीस आमदार महेश बालदी, महापौर कविता चौतमोल, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपमहापौर सीता पाटील, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, २७ गाव प्रकल्पबाधित कृती समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, रुपेश धुमाळ, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक हरेश केणी, नगरसेविका दर्शना भोईर, प्रमिला पाटील, राजेश गायकर, सुरेश पाटील, प्रेम पाटील, विजय गायकर, दीपक पाटील, रविनाथ पाटील, मनोहर पाटील, शैलेश घाग, समिती, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पनवेल तालुक्यात होऊ घातलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचे नाव द्यावे यासाठी सन २००८ पासून सिडकोकडे सातत्याने विविध संघटना,संस्था व प्रकल्पग्रस्तांची सातत्याने मागणी आहे.

मागील वर्षी १० जून साखळी आंदोलन, २४ जूनला लाखो भूमिपुत्रांच्या उपस्थितीत सिडको घेराव आंदोलन, ०९ ऑगस्ट क्रांती दिनी गावागावात मशाल मोर्चा झाला. तर १३ जानेवारी २०२२ रोजी भूमिपुत्र निर्धार परिषद अशी लक्षवेधी ऐतिहासिक आंदोलने झाली. दुसरीकडे सिडकोने या सार्वत्रिक मागणीकडे दुर्लक्ष करीत याविषयी गुपचूप केलेला ठराव विखंडित करण्याचा निर्णय आजवर घेतलेला नाही. या पार्श्वभूमीवर १३ जानेवारी रोजी झालेल्या भूमिपुत्र निर्धार परिषदेत विमानतळ बाधित २७ गावांच्या प्रलंबित समस्या सोडवण्या विषयी सिडकोस अल्टिमेटमही देण्यात आला होता.याकरिता पोलीस अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने २० जानेवारीस सिडको प्रशासनाबरोबर २७ गाव विमानतळ बाधित प्रतिनिधी आणि विमानतळ नामकरण कृती समिती प्रतिनिधी यांची सिडको भवनात बैठक घेण्यात आली. मात्र सिडको प्रशासन थातूरमातूर उत्तरे देत आपली नैतिक जबाबदारी टाळत असल्याचे बैठकीत स्पष्ट दिसून आले. त्यामुळे विमानतळाचे काम बंद पडल्या शिवाय सिडको वठणीवर येणार नाही, त्यामुळे २४ जानेवारीला विमानतळाचे काम बंद पाडण्याचे सर्वानुमते घोषित करण्यात आले आहे. कोविडचा प्रोटोकॉल पाळून सिडकोच्या मुजोरी विरोधा–तील या आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन या बैठकीतून करण्यात आले.



सर्व समाजाच्या दृष्टिकोनातून गोर गरिबांचे कैवारी लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला मिळावे आणि ती आपली भूमिपुत्रांची अस्मिता आहे. प्रकल्पग्रस्तांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सिडको करीत आहे. पोलिसांनी केलेल्या आवाहनानुसार काल सिडको अधिकाऱ्यांसोबत सर्व पक्षीय कृती समिती, २७ गाव समिती पदाधिकारी यांची बैठक झाली. सिडकोने केलेला ठराव विखंडीत करून दिबासाहेबांच्या नावाचा ठराव करा तसेच २७ गावातील प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी लावा असे या बैठकीत सिडकोला ठणकावून सांगण्यात आले.मात्र त्या बैठकीत सिडकोने प्रत्येक विषयात टाळाटाळ केली, थातुरमातुर उत्तरे देत, चार दिवसात पुन्हा चर्चा करू अशी संधीसाधू पणा करत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक बाबतीत सिडकोची उदासीनता यावेळी दिसून आली. प्रकल्पग्रस्तांचे बोलणे,रडणे त्यांना ऐकू येत नाही. त्यामुळे २४ जानेवारीला आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनाला किमान १० हजार भूमिपुत्र उपस्थित राहतील.

**- माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर**



दिबासाहेबांचे नाव विमानतळाला द्यावे आणि प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी, हि आमची आग्रही मागणी आहे. 'आधी पुनर्वसन मग प्रकल्प' हे शासनाचे धोरण असतानाही शासन दुर्लक्ष करत आहे. आणि यामध्ये राज्य शासन उदासीन आहे. राज्य शासनाची भूमिका प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टिकोनातून मारक आणि घातक आहे, त्यामुळे राज्य शासनावर खटला दाखलच केला पाहिजे. कालच्या बैठकीत सिडकोच्या एमडींचा सकारात्मक दृष्टिकोन नव्हता. पाहतो, बघतो हि भूमिका सिडकोने बैठकीत प्रदर्शित केली. त्यामुळे २४ जानेवारीला प्रकल्पग्रस्ताच्या सर्व संघटना एकत्र येऊन लाक्षणिक काम बंद आंदोलन करणार असून जो पर्यंत दिबांचे नाव लागत नाही तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटत नाही तो पर्यंत आंदोलने सुरूच राहतील.

**- दशरथदादा पाटील**

## संक्षिप्त...

### शाळेनंतर आता कॉलेजेस सुरू करण्याचा प्रस्ताव

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविड–१९ आणि ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, अभिमत विद्यापीठ, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील वर्ग ऑनलाईन सुरू असून लवकरच ऑफलाईन सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आहे. अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज कोविड–१९ व ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक घेतली. बैठकीत राज्यात कोविड–१९ चा प्रादुर्भाव कमी होत असल्याने महाविद्यालय ऑफलाईन सुरू करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव पाठवला आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर महाविद्यालये ऑफलाईन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल असे श्री. सामंत यांनी सांगितले.

दरम्यान, कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विद्यापीठं आणि महाविद्यालयं १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला होता. त्यानुसार, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे विद्या–र्थी आणि शिक्षकांच्या आरोग्याच्या दृष्टीनं महाविद्यालयं आणि विद्यापीठ बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आता, राज्यातील शाळा २४ जानेवारीपासून सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर, लवकरच महाविद्यालययेही सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे दिसून येत आहे.

## दुकान फोडीतील तीन आरोपींना पेण पोलिसांकडून अटक



**दै.रायगड नगरी । पेण**

गेल्या महिन्यात डिसेंबर मध्ये पेण शहरात एकाच रात्री मध्ये आठ दुकाने फोडण्यात आलेल्या गुन्ह्यातील तीन आर–ोपींना पेण पोलिसांना अटक करण्यात यश आले आहे. त्यांना आज न्यायालयात हजर केले असता २५ जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्या कडून मुद्देमाल ही जप्त करण्यात आले आहे.

पेण शहरातली पेण खोपोली मार्ग वरील जलाराम मेडीकल स्टोअर्स, डिमेलोज केक शॉप, साई राज स्वीट मार्ट, रिंगरोड स्टोअर, स्वरा कलेक्शन, चिंतामणी जनरल स्टोअर, चावडीनाका येथील आईस्क्रीम पार्लर व मोबाईल शॉपी या आठ दुकानांचे शटर वाकवून अज्ञात चोरट्यांनी १२ डिसेंबरच्या मध्यरात्री ३६ हजार रुपये रोख रक्कम व एक मोबाईल असा ऐवज घेऊन पोबारा केला होता. दुकानांचे शटर वाकवून चोरी करणारे चोरटे हे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले होते. १९ ते २२ वर्षीय चार चोरटे शटर वाकवताना व चोरी करताना सीसीटीव्ही मध्ये कैद झाले असताना सुध्दा त्यांचा तपास लागत नसल्याने पेण पोलिसां समोर चोरांना पकडण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. या बरोबरच याच पेण खोपोली मार्गावरील एसबीआय बँकेचे एटीम वर दरोडा टाकून


.../२

## जेएनपीटीच्या मागील वर्षी आठ पदरी पुलावरील खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मंदगतीने

### रखडत सुरू असलेल्या कामामुळे वाहतूकीची समस्या

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदराशी जोडणारा एनएचबी– ४ या महामार्गावर नव्याने बांधण्यात येत असलेल्या आठ पदरी पुलावरील वर्षांपूर्वी खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम कासवगतीने सुरू असल्याने दररोज जेएनपीटी बंदरात ये–जा करणाऱ्या शेकडो वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. यामुळे मात्र वाहतुकदारांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे वर्षांपूर्वी खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम १५ दिवसांत पूर्ण होईल असे नॅशनल हायवे इंडिया थारिटीचे अध्यक्ष प्रशांत फेगडे यांनी सांगितले होते. मात्र वर्षांनंतरही दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले नाही. यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.



मुंबई जेएनपीटी पोर्ट रोड कंपनीकडून जेएनपीटी परिसरात कोरिडॉर, आठ पदरी रस्ते तसेच सात उड्डाणपूल उभारण्यात येत आहेत. सुमारे तीन हजार रुपये खर्चाची ही सर्व कामे नॅशनल हायवे इंडिया थारिटी मार्फत सुरू आहेत. बहुतांश कामे मुदतीत झालेली नाहीत. त्यामुळे वारंवार संबंधित कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. तरीही अनेक कामे अद्यापही रखडत रखडत सुरू आहेत. यामध्ये जेएनपीटी बंदराशी जोडणारा एनएचबी – ४ या महामार्गावर नव्याने बांधण्यात येणाऱ्या आठ पदरी रस्ता व उड्डाणपूलाचाही समावेश आहे.

जेएनपीटी बंदराशी जोडणाऱ्या उड्डाणपूलाच्या टोकाशी सुरू असलेल्या या आठ पदरी पुलावरील रस्त्यावरील मातीचा भराव ६ जानेवारी २०२१ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अचानक रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यापूर्वीच खचला होता. तसेच एका बाजूच्या सर्व्हिस रोडलाही मोठ्या प्रमाणात तडे गेले होते. त्यामुळे वर्षभरापासून या खचलेल्या सुमारे ५०० मीटर लांबीच्या खचलेल्या रस्त्याचे दुरुस्तीचे काम सुरू आहे. या खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामामुळे मागील वर्षभरापासून

.../२

## श्रीवर्धन नगर परिषदेचा मोकाट घोड्यांवरील लगाम सुटला, मोकाट घोड्यांचा उपद्रव पुन्हा सुरू

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरात फिरणाऱ्या मोकाट घोडे व गुरे यांचा लगाम नगरपरिषदेला केव्हाही घालता आला नव्हता. केवळ काही पत्रकारांना हाताशी धरून अशा प्रकारच्या बातम्या नगरपरिषदेकडून प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. श्रीवर्धन समुद्र किनारी येणाऱ्या पर्यटकांसाठी अनेक घोडे मालक घोड्यांची सफारी किंवा घोडागाडी याचा व्यवसाय करतात. पर्यटकां बरोबर दिवसभर धंदा केल्यानंतर आपले घोडे श्रीवर्धन समुद्रकिनारी मोकाट सोडून देतात व जमलेले पैसे खिशात घेऊन आपल्या घरी निघून जातात. श्रीवर्धन समुद्रकिनारी असलेले रिसॉर्ट मालक त्याचप्रमाणे अनेक शेतकरी यांनी नगरपरिषद कडे अनेक वेळा लेखी निवेदन देऊन मोकाट घोड्यांचा व गुरांचा बंदोबस्त करण्याबाबत मागणी केली होती. परंतु सदर निवेदनाला नगरपरिषद प्रशासनाने केराची टोपली दाखवल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरचे मुकाट घोडे सर्वत्र फिरत असल्यामुळे घोड्यांची विष्ठा अनेक ठिकाणी पडलेली असते. त्यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरलेली देखील पाहायला मिळते. श्रीवर्धन नगरपरिषद ही ब्रिटिश कालीन असून नगर परिषदेला शंभरपेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. नगरपरिषद कार्यालयाच्या बाजूलाच नगरपरिषदेच्या मालकीचा कोंडवाडा होता. या ठिकाणी मोकाट फिरणारी गुरे,गाढव, घोडे, बकऱ्या यांना आणून लोक कोंडवाड्यात टाकत असत. त्यानंतर नगरपरिषद प्रशासन सदर गुरे मालकांकडून रितसर दंडाची पावती घेऊन गुरे व डांबलेली जनावरे सोडत असे. परंतु नगरपरिषदेने कोणताही विचार न करता या कोंडवाड्याच्या जागी पर्यटक निवास बांधल्यामुळे नगरपरिषदेची खऱ्या अर्थाने गोची झाली आहे. कारण जरी मोकाट गुरे किंवा घोडे पकडले तरी त्यांना कुठे

.../२

## नायब तहसीलदार संजीव मांडे यांच्या मातोश्रींचे निधन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलचे नायब तह–सीलदार संजीव मांडे यांच्या मातोश्री सुशीला मधुकर मांडे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने आणि अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातू आहेत. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे उत्तर कार्य राहत्या घरी तळेगाव, खालापूर येथे २५ जानेवारी रोजी होणार आहे.

## पालीत संकष्टी चतुर्थीला भाविकांचा भक्तिमळा फुलला



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

आय.एस.ओ मानांकन प्राप्त व अष्टविनायकांपैकि प्रख्यात धार्मीक स्थळ असलेल्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दि.(२१) शुक्रवारी संकष्टी चतुर्थीला पालीत भाविकांची अलोट गर्दी दिसून आली. कोव्हीडच्या तिसऱ्या लाटेत देखील कोरोना नियमांचे पालन करीत भाविक मोठ्या संख्येने मंदिरात दर्शन घेताना दिसून आले, बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी

राज्य व देशातून भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थीत राह–तात. अशातच दर्शनासाठी येणार्या भाविकांच्या उत्तम सोईसुविधेसाठी बल्लाळेश्वर देवस्थान

.../२

# धक्के आणि सरशी


महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांमधील १०६ नगर पंचायती आणि विदर्भातील भंडारा तसेच गोंदिया या दोन जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे निकाल हाती आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार ओबीसी प्रवर्गासाठी राखीव जागा न ठेवता या निवडणुका झाल्या आहेत. या निवडणुका ढोबळ मानाने ग्रामीण महाराष्ट्राचा कल सांगत आहेत. देशात सर्वाधिक नागरीकरण झालेल्या महाराष्ट्रातील महानगर पालिकांच्या निवडणुकाही फारशा दूर नाहीत. त्या झाल्यानंतर एकंदरीत राज्याचे राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल. अर्थात, ग्रामपंचायती, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या नेहेमीच अचूक राजकीय चित्र दाखवत नाहीत. याचे कारण, बऱ्याचदा स्थानिक पातळीवर पक्षांची वेस ओलांडून बऱ्याच घडामोडी, तडजोडी आणि सांधेजोडी होत असतात. अनेकदा एकाच पक्षातील दोन गट परस्परांच्या विरोधात आतून किंवा बाहेरून लढत असतात. आत्ताही अनेक ठिकाणी हे चित्र दिसले आहेच. राज्यात शिवसेनेचे मुख्यमंत्री आहेत. तसेच, या पक्षाकडे अनेक महत्त्वाची खाती आहेत. असे असूनही भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना या चार पक्षांच्या कामगिरीत शिवसेनेचा अखेरचा क्रमांक लागावा, हे धक्कादायक आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यापासूनच काही राजकीय निरीक्षक 'आता यापुढे राष्ट्रवादी काँग्रेसचे बळ वाढत जाईल आणि शिवसेनेची ताकद उणावत जाईल,' असे भाकीत करीत आहेत. हे निकाल या अंदाजाची पुष्टी तर करत नाहीत ना? राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांनी 'आपणच पहिल्या क्रमांकावर आहोत,' असा दावा केला आहे. या दोघांच्या साठमारीत उर्वरित दोघे म्हणजे रेवड्यांच्या बक्षिसावर छोट्या कुस्त्या खेळणारे उपमल्ल आहेत, अशी हवा काहीजण निर्माण करीत आहेत. प्रत्यक्षात, काँग्रेसने विदर्भात चांगली कामगिरी केली आहे. भंडारा जिल्हा परिषदेत काँग्रेसने ५२ पैकी २१ जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसचे मित्रपक्ष प्रामाणिकपणे वागले तर तेथे काँग्रेसची सत्ता येऊ शकते. गोंदिया जिल्हा परिषदेतही भाजपच्या सर्वाधिक जागा आल्या असल्या तरी दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस आहे. हे दोन्ही जिल्हे वाचाळ प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रभावाचे आहेत, याची दखल काँग्रेसच्या इतर नेत्यांनी तसेच मित्रपक्षांनीही घ्यायला हवी. नारायण राणे यांनी शिवसेना सोडल्यापासून तळकोकणात काही भागाची कायमची रणभूमी झाली आहे. त्यामुळे, कोणतीही निवडणूक व निकाल बर्हिगोल भिंगातून पाहण्याची सवय सर्वांना लागली आहे. काही दिवसांपूर्वी राणे यांच्या पॅनेलने बँक जिंकली पण आता देवगड आणि कुडाळ या दोन्ही नगर पंचायती राणे यांच्या वर्चस्वाखाली राहिलेल्या नाहीत. वैभववाडी आणि दोडामार्ग या पंचायती मात्र भाजपने सहज जिंकल्या आहेत. आता देवगड व कुडाळमध्ये राणे यांना निकालोत्तर चमत्कार करण्याची संधी आहे. राज्य पातळीवर काम करणाऱ्या नेत्यांना आपापल्या वर्चस्वक्षेत्रात धक्का बसला का, हाही या निकालांमधील औत्सुक्याचा भाग असतो. कधी कधी असे धक्के मुद्दामही दिले जातात. पुढच्या विधानसभा निवडणुकीत नेते रुळावर यावेत, यासाठी हे इशारे असतात. धक्का आणि सरशीचा हाच निकष लावला तर बीडमध्ये पंकजा मुंडे यांनी यश मिळवले तर धनजंय मुंडे मंत्री असूनही मागे पडले. सातारा जिल्ह्याच्या पाटणमध्ये गृहराज्यमंत्री व घराण्याचा वारसा असूनही शंभुराज देसाईंना फटका बसला. तेथे सत्यजित पाटणकर या दुसऱ्या घराण्याच्या शिलेदाराने बाजी मारली. मात्र, ही लढत राष्ट्रवादी आणि शिवसेना अशी झाली. असे राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्यातील संघर्ष जागोजागी झडले आहेत. विधानसभांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांमध्ये जागा वाटप झालेच; तर हे सारे हिशेब तेव्हा निघतील आणि पुढची वाटचाल सोपी उरणार नाही. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यापासून तीन विरुद्ध एक अशी शत्रुमित्रांची असमान वाटणी झाली आहे. त्यामुळे, पहिल्या क्रमांकावर असल्याचा भाजपचा दावा मान्य केला तरी विरोधातल्या महाविकास आघाडीने जिंकलेल्या नगर पंचायतींच्या सदस्यांची संख्या कितीतरी अधिक आहे. या कामगिरीत पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे यश जसे महत्त्वाचे आहे; तसेच, विदर्भातील काँग्रेसची मुसंडीही लक्षणीय आहे. खरेतर, या निवडणुकांमध्ये केंद्रीय मंत्री, नेते, राज्यातले मंत्री व ज्येष्ठ नेते यांनी प्राणांची किती बाजी लावायची, याला काहीतरी मर्यादा हवी. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये प्रत्येक निवडणूक म्हणजे जणू जीवनमरणाची लढाई आहे, अशा थाटात पैसा ओतला जातो. माणसे पळवली जातात आणि हिंसाचारही होतो. आताही मोठ्या संख्येने निवडून आलेल्या अपक्षांचे घोडेबाजार एव्हाना सुरूही झाले असतील. हे सगळे मिनी महाभारत आटोपून या नगर पंचायती आता या आव्हान काळात लोकांसाठीही वेगाने काम करतील तर बरे होईल.

# म्हसळा नगरपंचायत गटनेते पदी संजय कर्णिक यांची निवड

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

नुकत्याच पार पडलेल्या म्हसळा नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने १७ पैकी १३ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. खास. सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनुसार आज दिनांक २२ जानेवारी २०२२ रोजी सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक झाली त्यामध्ये पक्षाचे गटनेते पदी संजय कर्णिक यांची एकमताने निवड करण्यात आली. म्हसळ्यातील एक संयमी, शांत आणि अष्टपैलू नेतृत्व त्याचप्रमाणे राजकीय, सामाजिक, शिक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभवी म्हणून संजय कर्णिक यांची चांगली ओळख असून विरोधकांसह सर्वांचीच कामे तत्परतेने त्यांचा हातकंडा आहे. मावळत्या नगरपंचायतीमध्येही गटनेते पदासह प्र. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, विविध समित्यांचे सभापती अश्या माध्यमातून त्यांनी शहराच्या विकासासाठी चांगली कामगिरी केली आहे. गटनेते पदी निवड झाल्यावर त्यांनी आमच्या प्रतिनिधिशी बोलताना सांगितले कि खास. सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती ताई तटकरे, आम. अनिकेत तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन मतदारांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर प्रचंड प्रमाणात विश्वास दाखविला असून या यशाचे संपूर्ण श्रेय खास. सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आम. अनिकेत तटकरे यांचेच असल्याचे सांगितले.

खासदार सुनिल तटकरे यांचे आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष रियाजभाई घराडे यांचे अध्यक्षतेखाली गटनेता निवडीसाठी नवनिर्वाचित नगरसेवक संजय कर्णिक, संजय दिवेकर, नगरसेविका जयश्री कापरे, कमळ जाधव, सरोज म्हशीलकर, मेहजबिन दळवी, नौसीन चोगले, नगर सेवक सुनिल शेडगे, असहल कादिरी, नगरसेविका फरहीन बशारत, सुमैया आमदानी, सारा म्हसलाई, शाहिद जंजिरकर यांचे उपस्थितीत संपन्न झालेल्या सभेत विद्यमान नगरसेवक संजय कर्णिक यांची एकमताने निवड करण्यात आली. संजय कर्णिक हे प्रभाग क्रमांक १६ मधुन ३२७ मत घेऊन दणदणीत विजयी झाले आहेत त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत २० वर्षांचा प्रशासकीय कामांचा चांगला अनुभव आहे. ग्राम पंचायत सदस्य ते नगरसेवक म्हणुन शहरात उत्कृष्ट काम केले आहे.मागील पाच वर्षाचे नगर पंचयतीत सत्तेत असताना कर्णिक यांनी गट नेता, उपनगराध्यक्ष तसेच बांधकाम, आरोग्य या विषय समितीचे सभापती पदी उत्कृष्ट काम केले आहे. खासदार सुनिल तटकरे यांनी अनुभवी पदाधिकारी म्हणुन संजय कर्णिक यांचे नावाला सर्वानुमते



पसंती दिली असता शहर अध्यक्ष रियाज घराडे यांनी त्यांचे नाव जाहीर केले.गटनेते पदाचे निवडी वेळी तालुका अध्यक्ष समीर बनकर, महिला शहर अध्यक्षा शगुप्ता जहांगीर, माजी उपनगराध्यक्ष शोहेब हलदे, जेष्ठ पदाधिकारी सलीम चोगले, शहर युवक अध्यक्ष नईम दळवी, उपाध्यक्ष चंद्रकांत कापरे, यशवंत पवार, भाई बोरकर, मुबिन हुर्जुक, ताहीर भाई,सलीम बागकर, मंगेश म्हशीलकर, शैबाज घराडे, अब्दुल रहीम उकये, नदीम दळवी, कासीम मेमन,बशारत, सर्फराज वस्ता, फैसल घरटकर, रविंद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. तालुका अध्यक्ष समीर बनकर यांनी नवनिर्वाचित गटनेते संजय कर्णिक यांचे सह सर्व नगरसेवकांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि सर्वांना जनसेवा करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या महाप्रबंधक अपर्णा जोगळेकर यांनी नवी मुंबई झोनचा पदभार सांभाळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बँकिंग उद्योगातील अग्रेसर असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या नवी मुंबईचा अपर्णा जोगळेकर यांनी नुकताच पदभार सांभाळला. अपर्णा जोगळेकर हे उच्च विद्याविभूषित असून त्यांची एल. एल. एम., एम.एस. डब्लू. फॉरेन्सिक अँड मेडिकल जुरीस्प्रुडेन्स, ह्यूमन राईट्स पदव्युत्तर व सायबर सुरक्षा विषया मध्ये आपले शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांची नुकतीच महाप्रबंधक पदी पदोन्नती होऊन ते नवी मुंबई झोन, वाशी येथे झोनल मॅनेजर म्हणून रुजू झाल्या आहेत. त्यांना बँकिंग क्षेत्रात प्रदीर्घ असा अनुभव असून ह्या अगोदर बँकेच्या नासिक, अमरावती, सातारा व पुणे येथे शाखा प्रबंधक व झोनल मॅनेजर म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. विशेष उल्लेखनीय असे की त्यांनी बँकेच्या मुख्य कायदा अधिकारी म्हणून बँकेच्या प्रधान कार्यालय, पुणे येथे महत्वपूर्ण कारागिरी निभावली आहे. त्यांनी आपल्या बँकिंग करिअरची सुरुवात कायदा अधिकारी म्हणून केली आहे. बँकेला विश्वास आहे की, त्यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई झोन



अंतर्गत ४४ शाखांमध्ये त्यांची उत्कृष्ट कामगिरी राहणार आहे. त्यांनी पदभार सांभाळल्या बद्दल बँकेच्या नवी मुंबई झोन मध्ये व रायगड जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन सर्वत्र आनंद व्यक्त होऊन आत्मविश्वास निर्माण झाला आहे. अपर्णा जोगळेकर यांनी समूह भावना व सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन नवी मुंबई झोन नक्कीच आपल्या उद्दिष्टांची पूर्ती करून बँकेला प्रगती पथावर नेईल असा विश्वास व्यक्त केला आहे.अपर्णा जोगळेकर यांनी पदभार सांभाळा त्याबद्दल उप प्रबंधक, अमित सुतकर, मुख्य प्रबंधक दिलीपकुमार उपाध्याय व मनीषा शर्मा यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# भारतीय मजदुर संघाची भविष्य निर्वाह निधी कार्यालयावर देशभर निदर्शने

**दै.रायगड नगरी । उरण**

कंत्राटी कर्मचाऱ्यांना १९९५ पासून भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे,या योजनेच्या माध्यमातून कंत्राटी कर्मचाऱ्यांना १९९५ पासून भविष्य निर्वाह निधी पेन्शन योजनेच्या माध्यमातून पेन्शन मिळते आहे, सद्या ही पेन्शन १००० एवढी तुटपुंजी आहे.वाढती महागाई बघता ती खूप अत्यल्प आहे, त्यात भरीव वाढ होण्याची आवश्यकता आहे, ही वाढ ५००० रूपये करावी. अशी मागणी भारतीय मजदुर संघाने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या कडे १९ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या प्रि बजेट मीटिंग मध्ये भारतीय मजदुर संघाने केली होती.

सदरची मागणी येत्या अर्थ संकल्पात मान्य करावी व या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवार दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी सर्व रिजनल ऑफिसवर निदर्शने करण्याचे ठरल्यानुसार त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्हा भारतीय मजदुर संघाने भविष्य निर्वाह निधी कार्यालय वाशी येथे निदर्शने करून निवेदन देण्यात आले. वाशी कार्यालयाचे सिनियर कमिशनर चव्हाण, कमिशनर श्रीवास्तव यांच्याकडे निवेदन सुपूर्द केले. भारतीय मजदुर संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष अनिल दुमने, रायगड जिल्हा अधक्ष व पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय सचिव सुरेश पाटील, जिल्हा सेक्रेटरी अशोक निकम, उपाध्यक्ष मधुकर पाटील, भारतीय मजदुर संघाचे नेते निरंजन कुमार, रवि जोशी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामगारांनी स्विकारले कामगार नेते महेंद्र घरत यांचे नेतृत्व



**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र सरकारचा उपक्रम असलेले HIL (हिल) रसायनी या कंपनीतील अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वातील NMGKS संघटनेचे सभासदत्व स्विकारले आहे. संघटनेच्या नामफलकाचे अनावरण संघटनेचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या शुभहस्ते आज करण्यात आले.

केंद्र सरकारच्या उदासीन धोरणामुळे तसेच मालक धार्जीन्या धोरणामुळे सार्वजनिक उपक्रमांच्या जमिनी अदानी - अंबानी यांच्या घशात घालण्यासाठी फायद्यातील उपक्रमांकडे मोदी सरकार दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. सहा - सहा महिने या कामगारांची पगारं दिली जात नाहीत. पिकती जमीन या प्रकल्पासाठी दिल्यामुळे उत्पन्नाचे साधनही उरलेले नाही त्यामुळे स्थानिक कामगार मेताकुटीस आले आहेत. आपले परिवार सांभाळता यावेत यासाठी रोजगार टिकला पाहिजे या आशेने कामगारांनी महेंद्रशेठ घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे.

संघटनेच्या नामफलक अनावरण प्रसंगी संघटनेचे कार्याध्यक्ष पि. के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, खा. ता. काँ. क. अध्यक्ष, नाना म्हात्रे, कार्याध्यक्ष कृष्णा पारींगे, रा. जि. काँ. क. उपाध्यक्ष अशोक मुंढे, म. प्र. यु. काँ. सचिव निखील डवळे, प्रशांत खाने, संदेश डवळे, दिपक ठाकूर, योगेश रसाळ, देवेंद्र पाटील, चेतन खाने, सागर सुखदरे, HIL चे कामगार सुमित सोनावणे, तुषार पवार, प्रितम कांबळे, किरण ठोंबरे, प्रसाद पाटील, चेतन चव्हाण आदी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दुकान फोडीतील तीन आरोपींना पेण पोलिसांकडून अटक

५६ लाख ३४ हजार ८०० रुपये घेऊन गेल्याने पेण पोलिसांवरील दबाव वाढला होता.

अखेर अथक प्रयत्न करुन पेण पोलिसांनी डिसेंबर महिन्यात झालेल्या आठ दुकानातील चोरी प्रकरणी रवी तानाजी धनगर ( वय १९ वर्षे, रा.आंबिवली-कल्याण), राज विजय राजापूरे ( वय २१ वर्षे, रा.मध्यप्रदेश-इंदोर ), सुनील राम धरणगोयल ( वय १९ वर्षे, रा.आंबिवली-कल्याण ) या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर या घटनेतील चौथा संशयित आरोपी बाळकृष्ण पाल हा ठाणे,नौपाडा येथे अटक आहे. या आरोपींना पेण न्यायालयात आज हजर केले असता त्यांना २५ जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या आरोपीं कडून ५ हजार ३०० रुपये रोख रक्कम व चोरीतील मोबाईल जप्त करण्यात आले आहे. तसेच या आरोपींनी पेण येथून चोरी केलेली मोटार सायकल चोरी केल्याचा गुन्हा व नेरळ शहरात चोरी केल्याचा गुन्हा कबूल केला आहे. या प्रकरणी रायगड पोलीस अधीक्षक अशोक दुधे, विभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण, पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्रीमती मीनल शिंदे या अधिक तपास करत आहेत.

## पुलावरील खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मंदगतीने

उड्डाण पुलावरून वाहतूक बंद करून सर्व्हिस मार्गावरुन सुरू करण्यात आली आहे. ती अद्यापही सर्व्हिस रोडवरुनच सुरु आहे.

खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम १५ दिवसांत पूर्ण होईल असे नॅशनल हायवे इंडिया थारिटीचे अध्यक्ष प्रशांत फेगडे यांनी त्यावेळी सांगितले होते. मात्र ठेकेदाराकडून कासवगतीने सुरू असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम एक वर्षाच्या कालावधीनंतरही रखडत रखडत सुरू आहे. या रखडत रखडत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे दररोज जेएनपीटी बंदरातून या रस्त्यावरून वाहतुक करून आयात निर्यात होणाऱ्या कंटेनर ट्रेलरमुळे वाहतूक कोंडींची समस्या निर्माण होते. दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येंमुळे वाहतूकदारांकडून संताप व्यक्त केला जात आहे. मागील वर्षांपासून कासवगतीने सुरू असलेल्या रस्त्याचे कामाबाबत विचारणा केली असता येत्या १५ दिवसांत दुरुस्तीचे काम पूर्ण होईल. अशी माहिती नॅशनल हायवे इंडिया थारिटीचे अध्यक्ष प्रशांत फेगडे यांनी दिली आहे.

## श्रीवर्धन नगर परिषदेचा मोकाट घोड्यांवरील लगाम सुटला

बांधून ठेवायचे हा प्रश्न नगरपरिषद प्रशासनासमोर आहे. मोकाट घोड्यांचे व गुरांचे मालक यांच्या वरती कारवाई करण्याचे सुद्धा नगर परिषदेकडून जाणीवपूर्वक टाळले जात आहे. श्रीवर्धन समुद्र किनारी असलेल्या खलाट्यामध्ये भात कापणी झाल्यानंतर अनेक शेतकरी वाल, चवळी, मूग यांसारखी कडधान्याची पिके घेत असत. परंतु घोड्यांच्या उपद्रवामुळे सर्व शेतकऱ्यांनी पीक घेणे बंद केले आहे. तरी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने मोकाट घोडे व गुरे यांच्या मालकांवरती तातडीने कारवाई करावी व त्यांचा पूर्णपणे बंदोबस्त करावा अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## पालीत संकष्टी चतुर्थीला भाविकांचा भक्तिमळा फुलला

ट्रस्ट व प्रशासन नेहमीच दक्ष व सज्ज असते. मंदिरे दर्शनासाठी खुली असल्याने भक्तांना बल्लाळेश्वराच्या दर्शनाची आगळीवेगळी ओढ दिसून येते. मागील दोन महिन्यांपासून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. संकष्टी, अंगारकी चतुर्थी दिनी पालीत भाविक भक्तगणांची मांदीयाळी असते. तर माघी मासोत्सवाला संपुर्ण पाली गाव भाविक भक्तगणांनी फुलून जाते. अंगारकी संकष्टी निमित्त बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी गर्दीचा उच्चांक गाठला. अशावेळी भाविक भक्तगणांची कोणतीही गैरसोय होवू नये, त्यांना शिस्तबध्द पध्दतीने रांगेत दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती खबरदारी घेत उपाययोजना करण्यात आली होती. सकाळपासूनच दर्शनासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या.

दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे सरपंच ऍडः धनजंय धारप, जितेंद्र गद्रे, माधव साने, विनय मराठे, उपेंद्र कानडे, सचिन साठे, राहुल मराठे आदिंसह अन्य पदाधिकार्यांनी पाली बल्लाळेश्वर देवस्थानात येणार्या भाविक भक्तगणांना आतंरराष्ट्रीय दर्जाच्या सेवासुविधा मिळाव्यात यादृष्टीने सुनियोजन केले आहे. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

### विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या मागणीला यश

# अमरधाम स्मशानभूमी येथील रस्त्यांच्या मधोमध असणारे विद्युत पोल हटविणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागील सप्टेंबर महिन्यात अमरधाम स्मशानभूमी येथील रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या विद्युत पोलला एक कार धडकली. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी त्या ठिकाणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी पालिका अधिकारी आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांना घेऊन पाहणी केली होती. व रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या धोकादायक विद्युत पोल हटवून भूमिगत करण्यासाठी सांगितले होते. त्यानुसार अमरधाम स्मशानभूमी येथील रस्त्यांच्या मधोमध असणारे विद्युत पोल हटविणार आहेत.



प्रभाग क्रमांक १८ सोबत पनवेल शहरांमधील इतर ठिकाणीही रस्त्याच्या मधोमध असणारे पोल संदर्भात तातडीने निर्णय घेण्याच्या सूचना देखील विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांना केले होते.

पुढील दोन दिवसात रस्त्याच्या मधोमध असणारे विद्युत पोल हटविण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे.

# राष्ट्रीय स्तरावरील बालविज्ञान परिषदेसाठी रायगड जिल्ह्यातील तीन प्रकल्पांची निवड

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे दरवर्षी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद या वैज्ञानिक उपक्रमाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, त्यांच्यामध्ये संशोधक वृत्ती वाढीस ला-गावी, त्यांना सर्वेक्षण पद्धतीचे आकलन होऊन त्यांच्यामध्ये जिज्ञासा, निरिक्षण, तर्कसंगत विचार हे गुण वृद्धींगत व्हावेत ह्या उद्देशाने ह्या राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेचे आयोजन केले जाते . 'शाश्वत विकासासाठी विज्ञान' हा यावर्षीच्या राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेचा मुख्य विषय आहे. तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते.

ह्यावर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सहभागी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने आपल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले .रायगड जिल्ह्यातील तीन प्रकल्पांची राष्ट्रीय स्तरावरील बालविज्ञान परिषदेसाठी निवड झाली आहे. हे तीन प्रकल्प व सहभागी विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत- १) कोको पीट गार्डनिंग ( अक्षरा ठाकूर व आर्या म्हात्रे - श्रीमती भागूबाई ठाकूर विद्यालय द्रोणागिरी , ता. उरण ) २ ) परफेक्ट न्युट्रीशनल फूड फॉर प्रेगनंट वूमेन ( ध्रुवी मोकल व सायली महाडीक - महात्मा गांधी विद्यालय चोरढे, ता. मुरुड ) ३) इंटीग्रेशन ऑफ व्हायटल मेझरमेंट डिव्हायसेस न्ड बेसिक लाईफ सपोर्ट प्रोसिजर ( निकुंज चौबे व सिद्धार्थ तिवारी - अपीजय स्कूल खारघर, ता. पनवेल ) हे तीन प्रकल्प यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक, सर्व तालुका समन्वयक, जिल्हा समन्वयक अनिल पाटील यांनी विशेष मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय विज्ञान परिषदेचे राज्य समन्वयक विश्वास कोरडे, रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना पवार शिंदे, विज्ञान पर्यवेक्षिका सविता माळी, रीना पाटील आदी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. ठाणे येथील जिज्ञासा ट्रस्ट यांनी राज्यस्तरीय बालविज्ञान पलिषदेचे यशस्वी आयोजन केले. यासाठी जिज्ञासा ट्रस्टचे अध्यक्ष सुरेंद्र दिघे व त्यांच्या सहका-यांनी विशेष परिश्रम घेतले.

राष्ट्रीय स्तरावरील बालविज्ञान परिषदेचे आयोजन फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात गुजरात सायन्स सिटी मार्फत ऑनलाईन पध्दतीने केले जाणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सावळ्या गोंधळाबाबत भाजप आक्रमक

**दै.रायगड नगरी । माथेरान**

आजपर्यंत इथे विविध कामात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सुरू असलेल्या सावळ्या गोंधळाबाबतीत स्थानिक पातळीवर कुणीही चकार शब्द काढत नसल्याने प्रत्येक बाबतीत या खात्याच्या गलथान कारभारामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. वेळेवर सुविधा उपलब्ध केल्या जात नसुन या खात्याकडून सर्वसामान्य ग्राहकांच्या मूलभूत प्रश्नांची उकल सुध्दा होत नाही. इथला कष्टकरी नागरिक सहसा अधिकारी वर्गाशी नेहमीच आदराने वागत आलेला आहे. वेळेत बिले सुध्दा अदा करीत असतात परंतु धनदांडग्या लोकांची पाठराखण करून सर्वसामान्य पाणी ग्राहकांना नेहमीच दुय्यम वागणूक दिली जात असल्याच्या वारंवार तक्रारी येत आहेत.

माथेरान शहर हे दुर्गम पर्यटनस्थळ असल्याने इथल्या नागरिकांना सर्व सोयीसुविधा वेळेवर मिळणे अपेक्षित आहे. याकामी माथेरानसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा कायमस्वरूपी शाखाधिकारी असावा या मागणीकरिता भारतीय जनता पार्टी माथेरान शाखेच्या वतीने दि.२० जानेवारी रोजी पनवेल येथील कार्यालयात समक्ष भेट देऊन भाजपच्या शिष्टमंडळाने निवेदन सादर केले यावेळी नवीन पाण्याच्या बाकी राहिलेल्या नळजोडण्या लवकरात लवकर पूर्ण करून खोदलेले रस्ते पूर्ववत करावेत.

सध्या माथेरान शहरातील पर्यटन व्यवसाय संपूर्ण ठप्प असल्याने थकबाकी वसुली सक्तीची करू नये, तसेच शहरातील थकबाकी वसूली होण्याकरिता निर्भय योजना लवकरात लवकर अमलात आणावी जेणेकरून पाणी ग्राहकांना याचा लाभ घेता येईल तसेच एप्रिल व मे महिन्याच्या ऐन पर्यटन हंगामात पाण्याची कमतरता भासू नये आणि शारलोट लेकमधील पाण्याचा उपसा करण्यात येऊ नये या सर्वांचे नियोजन आतापासूनच करण्यात यावे यासाठी कार्यकारी अभियंता नवीन पनवेलचे सूर्यवंशी व उपविभागीय अधिकारी कर्जत येथील कंटे मॅडम यांच्या समवेत भेट घेऊन चर्चा करण्यात आली. यावेळी भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, संदीप कदम, राकेश चौधरी व दीपक शहा हे उपस्थित होते.



# उरण नगर पालिकेच्या बायो मायनिंग प्रकल्पाचे उदघाटन

## डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची लागणार विल्हेवाट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उरण नगर पालिकेने बायो मायनिंग प्रकल्प सुरू केला आहे.त्याचे उदघाटन आज तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आणि पालिकेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते करण्यात आले. बोरी – पाखाडी येथिल डम्पिंग ग्राउंडवर सुरू झालेल्या या प्रकल्पात २००७ सालापासून साठलेल्या कचऱ्याचीही विल्हेवाट लावण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे उरण शहरातील कचऱ्याचा प्रश्न सध्यातरी मार्गी लागला आहे.

उरण नगर पालिकेला डम्पिंग ग्राऊंडसाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी २००७ साली बोरी पाखाडी येथिल इनामदार नगर हद्दीत समुद्रालगत एक हेक्टर क्षेत्राचा भूखंड दिला होता. त्या जागेत उरण शहरातील कचरा टाकला जात होता. मात्र या भूखंडा लगत असणाऱ्या हनुमान कोळीवाडा या गावाला कचऱ्याच्या दुर्गंधीचा त्रास होऊ लागल्याने व सदर भूखंड या गावाच्या पुनर्वसन येत असल्याने त्या ग्रामस्थांनी सदर डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

त्यावर निर्णय देताना न्यायालयाने सदर डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून हा भूखंड वनखात्याकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार उरण नगर पालिकेने या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू केले असून हे काम भाग्यदीप वेस्ट मॅनेजमेंट प्रा लि या कंपनीला दिले आहे. त्यासाठी सुमारे १० लाख ४५ हजारांचा खर्च होणार आहे. सुमारे तीन महिन्यात हे काम संपवून कचऱ्यापासून माती व खत निर्माण होणार आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावून सदर भूखंड वनखात्याकडे वर्ग करण्यात येईल असे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी स्पष्ट केले.



## 30 हजाराची लाच स्विकारणाऱ्या सिडकोच्या कार्यकारी अभियंत्याला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केलेल्या कामाचे बिलं मंजुर करण्यासाठी ठेकेदाराकडे दिड लाख रुपयांची लाचेची मागणी करुन त्यापैकी ३० हजाराची लाच स्विकारणाऱ्या सिडकोतील कार्यकारी अभियंता कल्याण पाटील याला ठाणे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने बुधवारी दुपारी रंगेहाथ अटक केली. विशेष म्हणजे कल्याण पाटील याने पुर्वीची ३ बिलं मंजुर करण्यासाठी १ लाख २० हजार रुपये स्विकारले होते.

या प्रकरणातील विपीन पाटील हा ठेकेदार खारघर येथील कोपरी गावात राहण्यास असून त्याने कळंबोळी ब्रिज, खांदा कॉलनी व खारघर रेल्वे स्टेशनची कामे पुर्ण केली होती. या तीन बिलाचे ७ लाख ५६ हजार रुपयांचे बिल मंजुर करण्यासाठी कार्यकारी अभियंता कल्याण पाटील याने २ लाख रुपये लाचेची मागणी केली होती. त्यानंतर पाटील यांनी दिड लाख रुपयांची मागणी केली होती. त्यावेळी ठेकेदार विपीन पाटील याने कल्याण पाटील यांना १ लाख २० हजार रुपये दिल्यानंतर त्याचे बिल मंजुर केले होते. त्यानंतर ठेकेदार विपीन पाटील याने कळंबोली ब्रिज व खारघर रेल्वे स्टेशन येथील ब्रिजची कामे पुर्ण करुन बिल सादर केले होते.

यावेळी देखील कल्याण पाटील यांनी मागील तीन बिलाचे बाकी राहिलेले ३० हजार रुपये व चालु नवीन तीन बलांचे दिड लाख रुपये दिल्यानंतरच त्याच्या बिलावर सही करणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे ठेकेदार विपीन पाटील याने गत १८ जानेवारी रोजी ठाणे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर कल्याण पाटील यांनी मागील बिलातील राहिलेली ३० हजाराची रक्कम घेऊन सीबीडीतील एमजीएम हॉस्पीटल जवळ बोलावले होते. त्यामुळे ठाणे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने याठिकाणी सापळा लावला होता. यावेळी त्याठिकाणी आपल्या चार चाकी कारमधुन आलेल्या कल्याण पाटील यांनी ठेकेदार विपीन पाटील याच्याकडून ३० हजारांची रोख रक्कम स्विकारल्यानंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्याला रंगेहात पकडले. त्यानंतर कल्याण पाटील याच्या विरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली.

## मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दिशादर्शक फलक करतोय दिशाभूल




**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर ते महाड दरम्यान मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दिशादर्शक फलक चक्क प्रवासी आणि वाहनचालकांची दिशाभूल करीत आहे. या फलकावर भोर हे मंडणगडच्या दिशेला असल्याचे दिशादर्शक बाणाने दर्शविल्याने हा घोळ वाढला आहे.

पोलादपूरहून कोकणातून मुंबईकडे जाताना महाड तालुक्यातील राजेवाडी फाट्याजवळील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील एक रस्ता मंडणगड तर त्या रस्त्याच्या विरुद्ध दिशेचा रस्ता भोर मार्गे पुणे येथे जाणारा आहे. मात्र राजेवाडी फाट्याजवळ अलिकडेच नव्याने लावण्यात हा फलक मंडणगड आणि भोर हे रस्ते एकाच दिशेला असल्याचे दर्शवित असल्याने भोरकडे जाणारे प्रवासी व वाहने मंडणगड रस्त्याकडे वळत असून काही अंतराने वरंध भोर घाट न लागल्यामुळे परत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर येत आहेत. यानंतर रस्ता ओलांडून राजेवाडीच्या विरूध्द दिशेला भोर रस्त्याकडे जात असल्याचे दिसून येत आहे. कोकणातून येणाऱ्या प्रवाशांना पुण्याकडे जाताना या दिशादर्शक फलकामुळे होणाऱ्या फसगतीमुळे दिशाभूल झालेल्या पर्यटक व प्रवाशांकडून नाहक मनस्ताप होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

## हुतात्मा हिराजी पाटील यांची १०८ वी जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मानिवली गावचे सुपुत्र आणि १९४२च्या चलेजाव आंदोलनात सहभागी झाल्यानंतर हुतात्मा झालेले हिराजी गोमाजी पाटील यांची १०८वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील यांच्या स्मारकात कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने जयंती उत्सवाचा सोहळा आयोजित केला होता.

मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने हुतात्मा हिराजी पाटील यांची १०८वी जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी तेथील हुतात्मा हिराजी पाटील यांच्या अर्ध पुतळ्याला संघटनेचे अध्यक्ष सावळाराम जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी जेष्ठ इतिहास संशोधक वसंत कोळंबे, ग्रामपंचायतीचे सरपंच तुषार गवळी, हुतात्म्यांचे नातेवाईक वामन पाटील, जयराम गवळी, रमेश गवळी, अनुसया जामघरे तसेच शरद भगत आदीसह संघटनेचे सचिव शिवराम बदे, खजिनदार शिवराम महाराज तुपे, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर दीपप्रज्वलन झाल्यानंतर नेरळ येथील स्वर अनुभूती अविष्कार प्रस्तुत क्रांतिकारक यांच्या जीवनावरील समर गीतांचा कार्यक्रम सादर झाला. संगीत विशारद कल्पना क्षीरसागर तसेच समूहाने देशभक्तीपर गीते सादर केली.

## प्रतिष्ठेच्या पाली नगरपंचायतीचा निकाल लागला ; आता प्रतीक्षा विकास कामांची

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायकाचे तीर्थक्षेत्र असलेली पाली नगरपंचायत सर्वच पक्षांसाठी प्रतिष्ठेची होती. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर व अडचणींवर मात करत अखेर पाली ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायत होऊन पहिली नगरपंचायत निवडणूक देखील पार पडली आहे. मात्र निवडून आलेल्या नगराध्यक्ष व नगरसेवकांसमोर असंख्य समस्या मार्गी लावण्याचे आव्हान आहेच. मात्र लोकांना देखील विकास कामांची आस लागली आहे.



पाली नगरपंचायतीची निवडणुकी शांततापूर्ण झाले. पाली नागरिकांच्या निवडून आलेल्या नगरसेवकांकडून मोठी अपेक्षा आहे. पाली नगरपंचायतीला वारंवार भेडसावणाऱ्या समस्या आता नक्कीच मार्गी लागणार अशी आशा पालीतील नागरिक करत आहेत. मागील वर्षानुवर्षे येथील असंख्य प्रश्न व समस्या जैसे थे आहेत. याशिवाय तीर्थक्षेत्र विकास नाही, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. कचरा व सांडपाण्याचे नियोजन नाही. नवीन बस स्थानकाला मुहूर्त नाही ग्रामीण रुग्णालय प्रलंबित आहे.याकडेही नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. पाली शुद्ध नळपाणी पुरवठा योजना मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित आहे. सद्यस्थितीत जवळपास १२ कोटींची शुद्ध नळपाणी योजना अजूनही कार्यान्वित झालेली नाही. तसेच बाह्यवळण मार्ग अजून झालेला नाही. या बाबत राज्यशासनाने सन २०१० ला वाकण पाली खोपोली राज्यमार्गावर बलाप येथून बाह्यवळण मार्गाला मान्यता दिली आहे. तसेच रस्त्यास १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली होती. सदरचा मार्ग हा पाली पाटणूस राज्यमार्ग ९४ ला झाप गावाजवळ जोडला आहे. या मार्गालगत येणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी नष्ट होणार असल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे मार्ग याबात तोडगा निघालेला नाही. हा मार्ग अडचणीत अडकला आहे. त्यामुळे पालीत सतत वाहतूक कोंडी होते. पाली शहरातील पार्किंग व्यवस्था, महत्त्वाच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय व्यवस्था असे अनेक प्रश्न नवनिर्वाचित नगरसेवक हे मार्गी लावतील अशी पालीकर नागरिकांची अपेक्षा आहे.

## अपघाताची मालिका खंडीत करण्यासाठी जांबरूंग फाट्यावर रस्त्यांचे काम करण्यास शेतकऱ्याने दिली संमती

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जगाचा पोशिंदा' अशी ओळख असलेल्या बळीराजाने वाहन चालकांचे जीव वाचविण्यासाठी आपल्या हद्दीत रस्ता बनविण्यासाठी संमती देत जगासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, खोपोली–कर्जत रस्त्यांचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. प्रशासन व शेतकरी यातील वादामुळे रस्त्यांवर जागोजागी पॅच सोडण्यात आले असल्याने वाहनधारकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. खोपोली व खालापूरकडून कर्जतकडे जात असताना जांबरूंग फाटा बढाई स्विट मार्ट समोरील रस्त्यांवर देखील पॅच सोडण्यात आला होता. त्यामुळे नेहमीच वाहतूक कोंडी व अपघात होत होते. अपघाताची मालिका खंडीत व्हावी, वाहनधारकांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळावा, यासाठी मोबदल्याचा विचार न करता जागा मालक शेतकऱ्यांने आपल्या जागेतून रस्ता बनविण्यास परवानगी दिली असल्याचे समजते.

शेतकऱ्याने परवानगी दिल्याने जांगरूग फाटा येथे कॉन्क्रीट रस्ता बनविण्याच्या कामाला आज सुरूवात करण्यात आली. रस्त्यांच्या कामाला सुरूवात झाल्यामुळे वाहनधारकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले. तसेच वाहन चालकांचे जीव वाचविण्यासाठी आपल्या हद्दीत रस्ता बनविण्यासाठी संमती दिल्याचे समजल्याने शेतकऱ्यांबद्दल आदर देखील वाहन चालकांच्या देहबोलीतून ओसंबडून वाहत असल्याचे दिसून आले.

वारंवार होणारे अपघात थांबावेत... वाहन कोंडी फुटावी, या उद्देशाने जांबरूंग फाट्यावर रस्त्यांचे काम करण्यास परवानगी दिली असल्याचे जागा मालक मुस्तफा दुस्ते यांनी 'मिडीया'शी बोलताना सांगितले.

## गोरगरीब रुग्णांसाठी डॉ.गुणे कुटुंबियांतर्फे आई वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ आगळी वेगळी श्रद्धांजली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोरगरीबांचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध असणारे डॉ. गोविंद गुणे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल त्यांचे सुपूत्र डॉ.गिरीश गुणे आणि डॉ. सौ.संजीवनी गुणे यांनी आपल्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ एक आगळी वेगळी श्रद्धांजली अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार डॉक्टरांची रुग्ण तपासणी फी देण्याची ऐपत नसणाऱ्या गोरगरीब रुग्णांना याचा लाभ घेता येणार आहे.

शहरात असलेल्या गुणे हॉस्पिटल येथे आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी डॉ.गिरीश गुणे आणि डॉ.सौ.संजीवनी गुणे या रुग्ण तपासणी फि आकारणार नाहीत.

तसेच वैद्यकीय उपचारासाठी मोफत सल्ला देतील. सदरहू रुग्णांनी शनिवारच्या तपासणीसाठी पुर्व नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी फोन नं.०२२–२७४५३०३३, ०२२–२७४५३९९२, ०९९२०७६३०८९ व ०९८६९७९३२२४ येथे साधायचा आहे.

या निशुल्क तपासणीतून पुढील उपचारासाठी गरज भासल्यास रुग्णांना (उदा. रुग्णालयातील ॲडमिशन किंवा शस्त्रक्रिया) डॉ.गिरीश गुणे व डॉ. सौ.संजीवनी गुणे वैयक्तीक फि आकारणार नाहीत. इतर सर्व खर्च (उदा.औषधे, शस्त्रक्रिया, साहित्य, भुलतज्ञांची फी, रक्त व इतर आवश्यक तपासण्या) रुग्णास करावयाच्या आहेत.

या सुविधेचा लाभ सर्वसाधारण कक्षातील दाखल रुग्णांसाठी असेल व त्याची सुरूवात आजच्या शनिवारपासून करत असल्याची माहिती डॉ.गिरीश गुणे यांनी दिली.

## भाजपा पुरस्कृत अपक्ष उमेदवार रितेश मुंढे ठरले किंग मेकर

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेनेची सत्ता उलथवून लावली असली तरी या निवडणुकीत लक्ष वेधले ते प्रभाग क्रमांक १४ येथील लढतीने या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस कडून देवयानी मोरे, शिवसेनेकडून योगेश शिर्के, भाजपा पुरस्कृत उमेदवार रितेश मुंढे, अपक्ष उमेदवार तब्बसुम रहाटविलकर, लता मुंढे अशी पंचरंगी लढत झाली.

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या निवडणुकांच्या जागा अनारक्षित करून त्या सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात येणार असल्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर प्रभाग क्रमांक १४ मधून भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव रविभाउ मुंढे यांनी त्यांचे पुत्र रितेश मुंढे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून आपली प्रतिष्ठा पणाला लावली, परंतु या प्रभागातील शिवसेना राष्ट्रवादी आणि अपक्ष उमेदवारांच्या चढाओढीत रितेश मुंढे यांना निवडून आणून रविभाउ मुंढे यांचे राजकारण उजवं ठरल्याचं आता स्पष्ट झाले आहे.

प्रभाग क्रमांक १४ मध्ये फोंडल वाडी, मेट मोहल्ला, दगडी शाळा परिसर असा भाग येतो या प्रभागात कुणबी समाज, शिंपी समाज, मराठा समाज, नाभिक समाज आणि मुस्लिम समाज आहे, या समजांपैकी येथे मुस्लिम समाजाचे प्राबल्य मोठ्या प्रमाणावर आहे. मुस्लिम समजाकडून देखील उमेदवार उभा असल्याने येथे लढत चुरशीची होणार हे पक्के झाले होते. मतदान झाल्यानंतर शिवसेना उमेदवार योगेश शिर्के, राष्ट्रवादी उमेदवार देवयानी मोरे आणि मोहल्यातील अपक्ष उमेदवार तब्बसुम रहाटविलकर या तिघांपैकी एक निवडून येणारं अशी चर्चा होती परंतु निकाला वेळी या सर्व शक्यतांना मागे टाकत अपक्ष उमेदवार रितेश मुंढे यांनी ५९ मतांनी विजय संपादन केला. रविभाउ मुंढे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केल्या नंतर त्यांच्या नेतृत्वखाली प्रथमच भाजपने तळा नगरपंचायत निवडणूक लढवली या निवडणुकीत भाजपाल घवघवीत यश मिळाले असून भाजपने सात प्रभागात आपले उमेदवार उभे केले होते या सात प्रभागापैकी दोन ठिकाणी कमळ या चीन्हावर उमेदवार निवडून आले आहेत तर एका ठिकाणी भाजप पुरस्कृत उमेदवार विजयी झालेला आहे.



## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील फेरीवाल्यांमुळे वाहतुकीस अडथळा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा सर्व्हिस रोडची रूंदी कमी असताना पूर्वेकडील सर्व्हिस रोडवरून मुंबईकडे तसेच कोकणाकडे जाणारी वाहतूक करताना फेरीवाल्यांचा अडथळा होत असल्याची लेखी तक्रार भारतीय जनता पक्षाचे वाहतूक सेल पोलादपूर तालुका प्रमुख विश्वास नलावडे यांनी केली आहे. पोलादपूर नगरपंचायतीमध्ये भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन ही लेखी तक्रार सादर केली आहे.

याप्रसंगी वाहतूक सेल पोलादपूर तालुका प्रमुख विश्वास नलावडे, जिल्हा कमिटी सदस्य राजन धुमाळ, माजी राजिप सदस्य अनिल नलावडे, मंगेश शिंदे, नितीन बोरकर, योगेश भोसले, आबा बनसोडे इत्यादी उपस्थित होते.

पोलादपूर शहरातून अंडरपास जाणाऱ्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या वरील बाजूने नियोजित सर्व्हिसरोड जात असून सध्या पूर्वे कडील सर्व्हिसरोडवरूनच कोकणात जाणाऱ्या तसेच कोकणातून येणाऱ्या वाहनांची दुहेरी वाहतुक सुरू असते. ही वाहतूक भविष्यातही पूर्वे कडील सर्व्हिसरोड वरूनच होत राहणार हे गृहित धरून या सर्व्हिसरोडवरील फेरीवाले, वडापाव तसेच अन्य टपऱ्या दूर करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वाहतुक सेलचे अध्यक्ष विश्वास नलावडे यांनी तक्रार अर्ज केला आहे. यावेळी नगरपंचायतीमध्ये कार्यालयीन अधिक्षक महादेव सरंबळे यांनी सदर अर्ज मुख्याधिकारी रोडगे यांना पुढील कार्यवाहीसाठी अवलोकनासाठी देण्याची ग्वाही दिली.